# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO २१००१:२०१८) (ISO/IEC २७००१:२०२२)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दूरध्वनी क्र. ०२२-६२५४२१००/१३२

संकेतस्थळ : www.msbte.ac.in ई-मेल : secretary@msbte.ac.in


जा. क्र. मरातंशमि/का-४० (परीक्षाविभाग)/F१०/२०२६/ ३२२ दिनांक: 31 AUG 2026

**महत्त्वाचे परिपत्रक**

**प्रति,**

प्राचार्य,

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी

संलग्नित सर्व AICTE मान्यताप्राप्त संस्था

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी दि. १५.०८.२०२६ नंतर नविन प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी (Enrollment) व त्यांचे हिवाळी-२०२६ परीक्षा अर्जाच्या वेळापत्रकाबाबत**

**संदर्भ:** १) मंडळाचे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीताचे वेळापत्रक-MSBTE/D४०/AcademicCalender/२०२६/१५२, दि. १५/०५/२०२६

२) मंडळाचे परिपत्रक क्र. मरातंशमि/का-४० (परीक्षाविभाग)/F१०/२०२६/३०३, दि. १४/०८/२०२६

३) तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/प्रवेशाचा सुधारित अंतिम दिनांक/२०२६/४३६, दि. २५/०८/२०२६

उपरोक्त संदर्भीय विषय व पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील AICTE मान्यताप्राप्त अभ्यासक्रमातील प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षामध्ये नविन प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी (Enrollment) व नियमित शुल्कासह हिवाळी-२०२६ परीक्षा अर्ज तसेच द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचे नियमित शुल्कासह हिवाळी-२०२६ परीक्षा अर्ज भरण्याकरिता संदर्भीय पत्र क्र. २ नुसार दि. २१.०८.२०२६ ते ३१.०८.२०२६ या कालावधीतील वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

दरम्यान, संदर्भ क्र. ३ नुसार तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थास्तरीय व सर्व प्रकारच्या प्रवेशांची अंतिम मुदत तसेच डेटा अपलोड करण्याची अंतिम मुदत **दि. १४.०९.२०२६** पर्यंत वाढविलेली आहे. या पार्श्वभूमीवर मंडळाशी संलग्नित सर्व AICTE मान्यताप्राप्त संस्थांना खालीलप्रमाणे स्पष्ट सूचना देण्यात येत आहेत.

**१. नियमित चालू सत्रातील विद्यार्थी (द्वितीय व तृतीय वर्ष) तसेच दि. १४.०८.२०२६ पर्यंत तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत प्रवेश निश्चित केलेले विद्यार्थी:**

- मंडळाच्या संदर्भीय पत्र क्र. २ (दि. १४.०८.२०२६) मधील वेळापत्रकानुसार ज्या विद्यार्थ्यांनी नियमित शुल्कासह प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी संदर्भ क्र. २ मधील विहित मुदतीनुसार **विलंब शुल्क व अतिविलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याचे वेळापत्रक पूर्ववत लागू राहील.** यात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**२. दि. १५.०८.२०२६ नंतर दि. १४.०९.२०२६ पर्यंत नव्याने प्रवेशित होणारे विद्यार्थी:**

- तंत्रशिक्षण संचालनालयाने दिलेल्या मुदतवाढीमुळे **दि. १४.०९.२०२६ पर्यंत नव्याने प्रवेश घेणारे विद्यार्थी, संस्था बदल** अथवा **अभ्यासक्रम बदल** झालेले विद्यार्थी यांच्यासाठी नियमित परीक्षा शुल्कासह नोंदणी (Enrollment), पुन्हा नोंदणी (Re-enrollment) व हिवाळी-२०२६ चे परीक्षा अर्ज भरण्याकरिता **मंडळामार्फत स्वतंत्रपणे नवीन वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात येईल.**

**३. संस्थास्तरावरील कार्यवाही:**

- संस्थांनी दि. १४.०८.२०२६ पर्यंत प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षामध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांचे नोंदणी व परीक्षा अर्ज संदर्भीय पत्र क्र. २ नुसार विहित मुदतीत विभागीय कार्यालयामार्फत निश्चित (Confirm) करून घ्यावेत.
- दि. १४.०९.२०२६ पर्यंत नव्याने प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचा डेटा संचालनालयामार्फत प्राप्त होताच मंडळाच्या आगामी वेळापत्रकानुसार त्यांची नोंदणी व परीक्षा अर्ज भरण्याची कार्यवाही करावी.

तरी सर्व संस्थाप्रमुखांनी वरील बाबींची नोंद घेऊन संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे व त्यानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी.

(डॉ. मारुती रा. जाधव)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई -५१

**प्रत:**

१) मा. संचालक, म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीस्तव सादर
२) उपसचिव, म. रा. तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय- मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता.